RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक १३०(२)] सोमवार, डिसेंबर १८, २०२३/अग्रहायण २७, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०००३२, दि. १८ डिसेंबर, २०२३.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र-२०२१/प्र. क्र. २२५/व्यशि-१.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय या शासकीय कार्यालयातील उपसंचालक (प्रशासन), गट-अ (अतांत्रिक) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या पदाच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमास व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील उपसंचालक (प्रशासन), गट-अ (अतांत्रिक) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा (सेवा प्रवेश) नियम, २०२३ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) "संचालनालय" याचा अर्थ, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय असा आहे;

(ख) "पदोन्नतीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे;

(ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे;

३. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील उपसंचालक (प्रशासन), गट-अ (अतांत्रिक) (राजपत्रित), महाराष्ट्र शिक्षण सेवा या पदावर सहायक संचालक (वरिष्ठ) किंवा उप सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, गट- अ (अतांत्रिक) (राजपत्रित) महाराष्ट्र शिक्षण सेवा हे पद धारण करणाऱ्या आणि या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा असणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण अगोदरच केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, तीने, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, संपूर्ण महाराष्ट्रात बदलीसाठी पात्र असेल.

७. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी केलेले कोणतेही नियम, आदेश किंवा शासन निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील अशा शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. नामदेव कोंडिबा भोसले,**
शासनाचे सह सचिव.

## SKILLS, EMPLOYMENT, ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400032, dated the 18th December, 2023.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. SEVAPRA-2021/C.R.225/VE-1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of the Deputy Director (Administration), Group-A (Non Technical) (Gazetted), Maharashtra Education Services, in the Government Offices, in the Directorate of Vocational Education and Training under the administrative control of the Skills,Employment,Entrepreneurship and Innovation Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Deputy Director (Administration), Group-A (Non Technical) (Gazetted), Maharashtra Education Service, in the Directorate of Vocational Education and Training (Recruitment) Rules, 2023.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Directorate" means the Directorate of Vocational Education and Training under the administrative control of the Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department of the Government;

(*b*) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time;

(*c*) "Government" means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Deputy Director (Administration), in the Directorate shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion and having not less than three years regular service on the post of Assistant Director or Deputy Secretary, Maharashtra State Skill Vocational Education and Training Board, Mumbai, Group –A (Non Technical) (senior) (Gazetted), Maharashtra Education Service, on the basis of seniority, from amongst the persons holding the said post.

4. A person to be appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

5. A person to be appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

6. A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable for transfer all over Maharashtra.

7. The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. NAMDEO KONDIBA BHOSALE
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.